।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १७ मे २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक २० वा

## सांगोल्यात जनगणना कार्यासाठी ६५ प्रगणक सज्ज राष्ट्रीय जनगणना कार्यासाठी नागरिकांनी सहकार्याचे करावे-मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी



सांगोला : केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जनगणना २०२६ कार्यास सांगोला शहरात सुरुवात झाली असून, या मोहिमेसाठी शहरात एकूण ६५ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे प्रगणक नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलनाचे काम करणार आहेत. देशाच्या विकासाचे नियोजन आणि विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या राष्ट्रीय जनगणना २०२६ कार्यास सुरुवात झाली असून, सांगोला नगरपरिषदेच्या हद्दीत हे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे.

या जनगणना प्रक्रियेसाठी शहरात एकूण ६५ प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली असून, हे प्रगणक नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करणार आहेत. नागरिकांनी प्रगणकांना योग्य, अचूक आणि संपूर्ण माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

देशाच्या प्रगतीचे पाऊल, जनगणनेत आपले पाऊल या संदेशातून नागरिकांनी जबाबदार नागरिक म्हणून राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे. जनगणनेतील अचूक माहिती ही देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाची ठरणार असल्याने नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

**जनगणनेत खोटी उत्तरे, माहितीस नकार दिल्यास अदखलपात्र गुन्हा**

जनगणना प्रगणकांना माहिती देण्यास टाळाटाळ करणे किंवा चुकीची माहिती देणे आता महागात पडू शकते. जनगणना कायदा १९४८ नुसार प्रत्येक नागरिकांनी अचूक माहिती देणे हे कायदेशीर बंधन असून यात कसूर केल्यास दंडात्मक आणि कायदेशीर कारवाईची तरतूद करण्यात आली आहे.

## टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी आज माण नदीत दाखल होणार

### आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश; शेतकऱ्यांना मोठा दिलासा

सांगोला : टेंभू प्रकल्पाच्या पाण्याचे सांगोल्यासाठी आवर्तन सुरू करण्यात आले असून, टेंभूच्या पाण्याने आटपाडी तलाव भरल्यानंतर आता माण नदीत ते पाणी सोडले आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात दुष्काळी परिस्थितीत सांगोल्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.सांगोला तालुक्यात यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, जनतेला दिलासा देण्यासाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू योजनेतून आवर्तन सुरू होण्यासाठी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पाठपुरावा केला होता.

टेंभू उपसा सिंचन योजनेतून सोडण्यात आलेले पाणी आज संध्याकाळपर्यंत माण नदीपात्रात पोहोचणार असल्याने सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उन्हाळयाच्या तीव्रतेमुळे पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेऊन टेंभू योजनेतून माण नदीला उन्हाळी आवर्तनाचे पाणी सोडावे अशीमागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी २८ एप्रिल रोजी लेखी पत्र देऊन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. तसेच सांगोल्यात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू योजनेतून लाभक्षेत्रातील जुनोनी, हातीद, पाचेगांव जुजारपूर, हटकर मंगेवाडी, राजुरी या गावातील तलाव, बंधारे पूर्ण क्षमतेने भरून टेंभूचे माण नदीमध्ये पाणी सोडून खवासपूर ते मेथवडे पर्यंतचे सर्व बंधारे भरण्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश आल्याने अखेर टेंभू योजनेचे पाणी माण नदीत दाखल होत असून, याचा लाभ तालुक्यातील शेतकरी, पशुपालक तसेच नागरिकांना होणार आहे. नदीपात्रातील पाण्यामुळे विहिरी व बोअरवेलच्या पाणीपातळीतही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

कोणत्याही गावाला पाणी कमी पडू नये, याची दक्षता घेण्याच्याही सूचना आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी



अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. ऐन उन्हाळयात टेंभूचे पाणी मिळाल्याने पिण्याचा पाण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने माणनदी नदीकाठावरील सर्व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी माण नदीत सोडण्याची मागणी मान्य केल्याबद्दल जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील त्याचबरोबर ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आभार मानले.

## अधिक मासानिमित्त सांगोल्यात दररोज हरिनाम दिंडीचे आयोजन



सांगोला : अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्ताने सांगोला शहरातील भाविक भक्तांसाठी दररोज सकाळी हरिनाम दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. १७ मे २०२६ पासून ही दिंडी सुरू होणार असून, दररोज सकाळी ६ वाजता श्री विठ्ठल मंदिर, कोष्टी गल्ली, सांगोला येथून दिंडीची सुरुवात होणार आहे.

या दिंडीत हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाच्या निनादात भजन, गवळणी तसेच भारुड यांचा समावेश असणार आहे. दिंडीचा मार्ग श्री विठ्ठल मंदिर, चौंडेश्वरी मंदिर, श्री छत्रपती शिवाजी चौक, हनुमान मंदिर, मेन रोड, मनेरी गल्ली, श्री संत डेबुजी चौक (परीट गल्ली), श्री शनी मंदिर, महादेव मंदिर, श्रीराम मंदिर, श्री दत्त मंदिर मार्गे पुन्हा विठ्ठल मंदिर, कोष्टी गल्ली असा असणार आहे.सदर दिंडीत सांगोला शहरातील सर्व भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

सहभागी भाविकांनी शक्यतो पांढरा शुभ्र पोशाख, टोपी असा वारकरी वेश परिधान करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## उन्हाळ्याची वाढती दाहकता आणि सततच्या पाण्याच्या उपश्यामुळे सांगोला तालुक्यातील तलाव कोरडे

सांगोला : उन्हाळ्याची वाढती दाहकता आणि सततच्या पाण्याच्या उपश्यामुळे चिंचोली ता सांगोला येथील तलावातील उपलब्ध पाणीसाठा मृतसाठ्यात पोहचला आहे.तर घेरडी १६:८० दलघफुट वगळता अचकदाणी व हंगिरंगे कोरडे पडले आहेत. तसेच जवळा तलावातील पाणीसाठा जवळपास संपुष्टात आला आहे. त्यामुळे जनावरे, माणसांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.

भीमा पाटबंधारे विभाग पंढरपूर अंतर्गत पाटबंधारे उपविभाग सांगोला तालुक्यातील चिंचोली, घेरडी, अचकदानी, हंगिरगे व जवळा या पाच ठिकाणी लघु प्रकल्प ( तलाव ) आहेत.

दरम्यान पावसाळ्यात वाहून जाणाऱ्या पाण्यातून सदरच्या तलावात उपयुक्त पाणीसाठा तयार होतो. चिंचोली तलावाची पाणी साठवण क्षमता ९८:८२ दलघफुट, आचकदानी -४७:६९ (दलघफुट) ,जवळा -४६:७१ (दलघफुट), घेरडी -९९:६७ (दलघफुट), हंगिरगे - ४७:०६ (दलघफुट) एवढी आहे. चिंचोली तलावाच्या लाभ क्षेत्रात चिंचोली सांगोला बिलेवाडी ही गावे येतात. चिंचोली तलावाच्या लाभ क्षेत्रात दोन पाणी वापर संस्था कार्यरत आहेत. शेतकऱ्यांच्या




मागणीनुसार रब्बी, खरीप व उन्हाळी हंगामात आवर्तन सोडले जाते तर तलावाच्या पाण्याचा सांगोला नगरपरिषद एखतपुर गावाबरोबर तलावाच्या परिसरातील विहिरी विंधन विहिरींना होतो.

त्याचप्रमाणे घेरडी, हंगिरंगे, जवळा अचकदाणी या तलावातील पाण्याच्या वापर शेतीसह जनावरे माणसांना पिण्यासाठी केला जातो. ऐन उन्हाळ्यात चिंचोली तलावासह चर्चा तलावातील पाणी संपल्यामुळे पाण्या अभावी शेती पिके फळे पिके करपू लागली आहेत. आगामी पावसाळ्यात तालुक्यातील चिंचोली अचकदानी जवळा, हंगिरंगे व घेरडी हे पाच तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर वर्षभर तलावातील पाण्याचा वापर शेतीसह जनावरे माणसांना पिण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

सांगोला तालुक्यातील पाटबंधारे विभागाच्या तलावातील सध्यस्थितीत उपलब्ध पाणीसाठा पुढीलप्रमाणे - चिंचोली १:२६ दलघफुट , अचकदाणी - शुन्य टक्के, जवळा-१:०३ दलघफुट ,घेरडी -१६:८० दलघफुट , हंगिरंगे -शून्य टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

# मुक्त विचार

## विचारधन



विद्यार्थ्यांनी कोणतीही गोष्ट आंधळेपणाने न स्वीकारता (गतानुगतिक वृत्ती टाकून) स्वतंत्र विचार करायला शिकले पाहिजे.

-महर्षी धोंडो केशव कर्वे

## जागतिक परिचारिका दिन: मायेच्या स्पर्शामागची अदृश्य ताकद

### रुग्णाच्या वेदनेसमोर उभा राहणारा मायेचा हात आणि आरोग्य व्यवस्थेचा खरा कणा

रुग्णालयाच्या दारातून आत पाऊल टाकताच माणूस सर्वप्रथम ज्या भावनेला सामोरा जातो, ती म्हणजे असुरक्षितता. आजारपण माणसाला केवळ शारीरिकदृष्ट्या कमकुवत करत नाही तर त्याच्या मनात भीती, अस्वस्थता आणि अनिश्चिततेचे ढगही दाटवते. रुग्णालयात डॉक्टर उपचार सुरू करतात पण रुग्णाच्या मनातला पहिला धीर अनेकदा परिचारिकेच्या स्पर्शातूनच जन्म घेतो. म्हणूनच रुग्णसेवेच्या जगात परिचारिका ही केवळ आरोग्य व्यवस्थेतील एक कर्मचारी नसते; ती उपचार आणि मानवता यांच्यातला सर्वांत जिवंत दुवा असते. दरवर्षी १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिन म्हणून पाळला जातो. आधुनिक परिचर्या सेवेची जननी मानल्या जाणाऱ्या ऋश्रेअॅशपलश छळसहींळपसरश्रश यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा होतो. पण हा दिवस केवळ औपचारिक अभिनंदनाचा नसावा तर तो समाजाच्या आत्मपरीक्षणाचाही दिवस असायला हवा. कारण आरोग्य व्यवस्थेच्या भक्कम इमारतीचा पाया जर कोणी असेल, तर तो परिचारिकांच्या निःशब्द, सातत्यपूर्ण आणि समर्पित सेवेत आहे.

परिचारिका म्हणजे फक्त इंजेक्शन देणारी किंवा औषधे वेळेवर देणारी व्यक्ती, अशी अनेकांची अजूनही मर्यादित समजूत आहे. प्रत्यक्षात परिचारिका रुग्णाच्या वेदनेचे सूक्ष्म निरीक्षण करते, त्याच्या प्रकृतीतील बदल सर्वप्रथम ओळखते, नातेवाईकांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर देते, डॉक्टरांच्या सूचनांचे काटेकोर पालन करते आणि गरज पडल्यास मानसिक आधारही देते. तिची भूमिका केवळ वैद्यकीय प्रक्रियेत मर्यादित नसते तर ती मानवी वेदनेशी थेट संवाद साधणारी असते. रुग्णालयात रात्रीचे अंधारलेले तास असोत किंवा पहाटेची वेळ रुग्णाच्या पलंगाजवळ जागी असणारी व्यक्ती अनेकदा परिचारिकाच असते. डॉक्टरांचे राऊंड ठराविक वेळी असतात; पण परिचारिकेची ड्युटी वेळेशी बांधलेली नसते. तिच्या जबाबदारीला घड्याळाचे काटे नसतात. कधी अतिदक्षता विभागात जीवन-मरणाच्या सीमारेषेवर झुंजणाऱ्या रुग्णाची काळजी, तर कधी प्रसूती कक्षात नवजीवनाच्या स्वागताची धावपळ, प्रत्येक ठिकाणी परिचारिकेची उपस्थिती अपरिहार्य असते.

कोरोना काळाने जगाला दाखवून दिले की आरोग्यसेवेचा सर्वांत सातत्याने धावणारा श्वास म्हणजे परिचारिका. संसर्गाची भीती, अपुऱ्या साधनसामग्रीची चिंता, स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहण्याची वेदना आणि मृत्यूचे रोज समोर दिसणारे भय, या सगळ्यांच्या छायेत हजारो परिचारिका न डगमगता उभ्या राहिल्या. अनेकांनी स्वतःचे आरोग्य धोक्यात घातले, काहींनी प्राणही गमावले. त्या काळात समाजाने त्यांना टाळ्या वाजवून सलाम केला; पण प्रश्न असा आहे की, संकट ओसरल्यानंतर त्या समर्पणाची आपण कितपत दखल घेतली? आजही अनेक परिचारिका प्रचंड कामाच्या ताणाखाली काम करतात. अनेक रुग्णालयांत कर्मचारी अपुरे असतात, त्यामुळे एका परिचारिकेवर असंख्य रुग्णांची जबाबदारी येते. सलग ड्युटी, रात्रपाळी, भावनिक ताण, संसर्गाचा धोका आणि अनेकदा कमी वेतन, या सगळ्यांमध्ये त्यांची सेवा सुरू असते. समाजाला परिचारिकेकडून करुणा, संयम, तत्परता आणि हसू अपेक्षित असते पण तिच्या थकव्याची, मानसिक ताणाची आणि वैयक्तिक आयुष्याच्या किंमतीची दखल किती जण घेतात?

ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण मोहिमा आणि जनजागृती अभियानांमध्ये परिचारिकांचे योगदान तर अधिकच महत्त्वाचे आहे. शहरात सुविधा असतात; गावात अनेकदा साधनसामग्रीही अपुरी असते. अशा परिस्थितीतही दुर्गम भागात सेवा देणाऱ्या परिचारिका केवळ नोकरी करत नाहीत; त्या समाजाच्या आरोग्याची जीवनरेषा सांभाळत असतात. महिलांचे प्रमाण या क्षेत्रात अधिक असल्याने परिचारिकांच्या प्रश्नांकडे लिंग-संवेदनशीलतेने पाहण्याचीही गरज आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षितता, सन्मान, छळापासून संरक्षण, मातृत्वाच्या गरजांची दखल आणि काम-जीवन संतुलन या प्रश्नांवर अजूनही पुरेसे लक्ष दिले जात नाही. करुणा देणाऱ्यांच्या आयुष्यातही करुणेची गरज असते, हे समाजाने विसरू नये.

परिचारिका म्हणजे केवळ वैद्यकीय यंत्रणेतील एक घटक नाही. ती वेदनेसमोर धीर देणारा आवाज आहे. ती भीतीसमोर आश्वासक उपस्थिती आहे. ती नवजात बाळाच्या पहिल्या श्वासाची साक्षीदार आहे आणि मृत्यूच्या उंबरठ्यावरच्या शेवटच्या क्षणातही शांततेचा हात धरून उभी असते. माणसाच्या आयुष्यातील सर्वांत असुरक्षित क्षणी जो हात आधार देतो, त्याचे महत्त्व शब्दांत मावणारे नाही. आजच्या स्पर्धात्मक, वेगवान आणि अनेकदा संवेदनाहीन होत चाललेल्या समाजात परिचारिकांचे अस्तित्व आपल्याला एक मूलभूत मूल्य आठवण करून देते, मानवता अजून जिवंत आहे. औषध उपचार करू शकते, तंत्रज्ञान निदान करू शकते पण मायेचा स्पर्शच अनेकदा जगण्याची उमेद परत आणतो. जागतिक परिचारिका दिनानिमित्त आपण हा संकल्प करू या, परिचारिकांचा सन्मान केवळ अभिनंदनात नसतो तर तो त्यांच्या कामाच्या अटी, सुरक्षितता आणि न्याय्य वेतनात दिसला पाहिजे. त्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यायची. त्यांच्या व्यावसायिक सन्मानाला समाजाच्या केंद्रस्थानी ठेवायचे. कारण शेवटी आरोग्य व्यवस्थेची खरी ताकद केवळ यंत्रांमध्ये नसते; ती त्या निःशब्द, जागत्या डोळ्यांत असते, जे रात्रभर एखाद्या अनोळखी रुग्णासाठी जागत असतात. त्यांच्या मायेचा स्पर्श, त्यांच्या सेवाभावाची ऊब आणि त्यांच्या समर्पणाचा प्रकाश आपल्या समाजाला अधिक मानवी, अधिक संवेदनशील आणि अधिक सशक्त बनवत राहो, हीच कृतज्ञ शुभेच्छा! जागतिक परिचारिका दिनानिमित्त सर्व परिचारिकांना मनःपूर्वक अभिवादन!

**-प्रविण बागडे,नागपूर**

## संग्रहालय : स्मृती, संस्कृती आणि भविष्याचा जिवंत सेतू

इतिहास केवळ पुस्तकांच्या पानांत राहत नाही; तो वस्तूंमध्ये, अवशेषांत, शिल्पांत, चित्रांत, हस्तलिखितांत आणि विस्मृतीच्या उंबरठ्यावर उभ्या असंख्य स्मृतींमध्ये जिवंत असतो. एखाद्या राष्ट्राची ओळख त्याच्या वर्तमानाच्या झगमगाटाने जितकी ठरते, तितकीच ती त्याने आपल्या भूतकाळाशी राखलेल्या नात्यानेही ठरते. म्हणूनच संग्रहालय हे केवळ जुन्या वस्तू ठेवण्याचे दालन नाही; ते एका समाजाच्या स्मृतींचे घर असते. १८ मे रोजी साजरा होणारा जागतिक संग्रहालय दिन हा केवळ औपचारिक दिन नसून आपल्या सांस्कृतिक वारशाकडे नव्याने पाहण्याची संधी आहे. आजचा काळ वेगाचा आहे माहितीचा, तंत्रज्ञानाचा, बदलाचा आणि विस्मृतीचाही. रोज नवे घडते आणि कालचे सहज मागे पडते. या धावत्या जगात संग्रहालये आपल्याला थांबायला शिकवतात. ती सांगतात की भविष्य घडवायचे असेल, तर भूतकाळ समजून घ्यावा लागतो. कारण इतिहास हा केवळ कालक्रम नसतो; तो समाजाच्या आत्म्याचा आरसा असतो.

आज आपण डिजिटल युगात जगत आहोत. मोबाईलच्या स्क्रीनवर जग मावले आहे. माहिती एका क्लिकवर मिळते. पण माहिती आणि जाण यांत फरक असतो. इंटरनेट माहिती देते, संग्रहालय संदर्भ देते. स्क्रीनवर एखाद्या वस्तूचा फोटो दिसतो, पण संग्रहालयात त्या वस्तूची वेळ, संदर्भ, उपयोग आणि मानवी कथा दिसते. म्हणूनच संग्रहालये आज अप्रासंगिक नाहीत, उलट अधिक आवश्यक झाली आहेत. भारतीय संस्कृतीचा विचार केला, तर भारत देश जणू अनेक थरांनी घडलेली सभ्यता आहे. सिंधू संस्कृतीपासून ते आधुनिक स्वातंत्र्यलढ्यापर्यंतचा इतिहास येथे एकमेकांत गुंफलेला आहे. विविध भाषा, धर्म, पंथ, कला, स्थापत्य, लोकपरंपरा आणि सामाजिक चळवळी यांचा विलक्षण संगम येथे आढळतो. या विविधतेचे साक्षीदार म्हणजे आपली संग्रहालये. ती केवळ राजे-महाराजांचा इतिहास जपत नाहीत; ती सामान्य माणसाचेही जगणे नोंदवतात. मात्र, एक कठोर वास्तव स्वीकारावे लागेल. आपल्या अनेक संग्रहालयांची अवस्था समाधानकारक नाही. काही ठिकाणी धुळीने माखलेले अवशेष, अपुरी माहितीफलक, कालबाह्य मांडणी, तुटपुंज्या सुविधा आणि लोकांपर्यंत पोहोचण्यातली कमतरता दिसून येते. वारसा जपण्याची जबाबदारी केवळ सरकारची नाही; ती समाजाचीही आहे. शासन, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक या सर्वांनी मिळूनच ही जबाबदारी उचलली पाहिजे.

आजच्या पिढीला इतिहासाशी जोडण्याचे आव्हान अधिक मोठे आहे. मुलांना भूतकाळ शिकवायचा असेल, तर तो जिवंतपणे दाखवावा लागेल. संग्रहालये ही त्यासाठी प्रभावी माध्यमे ठरू शकतात. शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन संग्रहालयभेटीला शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनवले पाहिजे. कारण जे डोळ्यांनी पाहिले जाते, ते मनात अधिक काळ टिकते. संग्रहालयांचे महत्त्व केवळ सांस्कृतिक नाही तर ते सामाजिक आणि लोकशाहीदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. इतिहासावर ज्याचा ताबा, भविष्याची दिशा अनेकदा त्याच्याकडे जाते. म्हणूनच वस्तुनिष्ठ, समावेशक आणि चिकित्सक इतिहासाची जपणूक अत्यावश्यक आहे. संग्रहालये समाजाला स्मरण करून देतात की इतिहास एकाच आवाजाचा नसतो; त्यात अनेक अनुभव, अनेक वेदना, अनेक विजय आणि अनेक संघर्ष सामावलेले असतात. विशेषतः आजच्या काळात, जेव्हा ओळखींच्या राजकारणातून इतिहासाचे अनेक अर्थ लावले जातात, तेव्हा संग्रहालयांची जबाबदारी अधिक वाढते. ती केवळ प्रदर्शनस्थळे नसून संवादाची जागा असली पाहिजेत. तिथे अभिमान असावा, पण अंधगौरव नसावा तर चिकित्सकता असावी, पण तुच्छताही नसावी. इतिहासाशी प्रामाणिक राहणे हीच संग्रहालयांची खरी प्रतिष्ठा आहे. नागपूर सारख्या शहरांमध्ये स्थानिक इतिहास, सामाजिक चळवळी, साहित्यिक वारसा, औद्योगिक परिवर्तन आणि लोकसंस्कृती यांचे दस्तऐवजीकरण अधिक व्यापकपणे व्हायला हवे. प्रत्येक प्रदेशाची स्वतःची स्मृती असते. त्या स्मृती हरवल्या, तर फक्त वस्तू हरवत नाहीत तर एक सामूहिक ओळख हरवते.

आजचा माणूस आधुनिकतेच्या मोहात अनेकदा मुळांपासून दूर जात आहे. प्रगती आवश्यक आहे; पण मुळे विसरून केलेली प्रगती अनेकदा रिकामी ठरते. संग्रहालये आपल्याला सांगतात बदल स्वीकारा, पण स्मृती हरवू देऊ नका. कारण ज्यांना आपला भूतकाळ ठाऊक नसतो, त्यांचे भविष्य अनेकदा उथळ ठरते. जागतिक संग्रहालय दिन हा केवळ शुभेच्छांचा दिवस नसावा; तो आत्मपरीक्षणाचा दिवस असावा. आपण आपल्या वारशाशी किती जोडलेले आहोत? मुलांना आपण इतिहासाशी कसे परिचित करून देतो? आपल्या शहरातील, गावातील स्मृती आपण जपतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची ही वेळ आहे. आज गरज आहे ती संग्रहालयांना जिवंत करण्याची. तिथे फक्त वस्तू नसाव्यात; कथा असाव्यात. फक्त अवशेष नसावेत; संवाद असावा. फक्त स्मृती नसाव्यात; प्रेरणा असावी. कारण संग्रहालये भूतकाळाची समाधी नसतात; ती भविष्याच्या जाणिवेची पाळेमुळे असतात. ती आपल्याला शिकवतात की काळ पुढे जातो, पण मूल्ये टिकवावी लागतात. संस्कृती जपावी लागते. स्मृतींचे रक्षण करावे लागते. जागतिक संग्रहालय दिनाच्या निमित्ताने आपण हा संकल्प करू या, आपल्या इतिहासाचा अभिमान बाळगू, पण तो समजून घेऊन आपल्या वारशाचे जतन करू, पण तो लोकांपर्यंत पोहोचवून आणि आपल्या पुढच्या पिढ्यांना फक्त माहिती नव्हे, तर स्मृतींची जाण देऊ. कारण शेवटी, संग्रहालयातील एखादी शांत वस्तू कधीकधी संपूर्ण पिढीला विचार करायला भाग पाडते आणि तेव्हाच कळते भूतकाळ जपणे म्हणजे मागे जाणे नव्हे तर पुढे जाण्यासाठी स्वतःला ओळखणे होय.

**-प्रविण बागडे,नागपूर**

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-२९ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला तालुक्यात ४ हजार शिधापत्रिका धारकांनाच रॉकेलचा लाभ मिळणार

## प्रथम येणाऱ्या कार्डधारकांना प्राधान्याने तीन लिटर रॉकेल मिळणार

सांगोला : संभाव्य गॅस टंचाईवर मात करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याप्रमाणे सांगोला तालुक्यातील १० मंडल मधील अंत्योदय व अन्न सुरक्षा योजनेतील शिधापत्रिका धारकांना प्रत्येकी तीन लिटर रॉकेल वाटप सुरू केले आहे. दुसरीकडे तालुक्यात ४४ हजार पात्र शिधापत्रिका धारक असताना केवळ ४ हजार शिधापत्रिका धारकांनाच रॉकेलचा लाभ मिळणार आहे तर एका मंडल मधील केवळ ४०० शिधापत्रिका धारकांना तेही प्रथम येणाऱ्या कार्डधारकांना प्राधान्याने तीन लिटर रॉकेल मिळणार आहे.

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे संभाव्य गॅस टंचाईवर



मात करण्यासाठी सरकारकडून प्रायोगिक तत्वावर अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेतील शिधापत्रिका धारकाला प्रत्येकी ३ लिटर केरोसीन वितरण केले जाणार आहे या अनुषंगाने पुरवठा निरीक्षण अधिकारी सांगोला यांच्यामार्फत सांगोला तालुक्यातील १० मंडळांमध्ये १० लायसन्सधारक वितरक नेमले आहेत.

जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडून सांगोला तालुक्यासाठी सुमारे १२ हजार लिटर केरोसीन ( रॉकेल ) चा कोटा मंजूर झाला असून, एका मंडलसाठी १२०० लिटर याप्रमाणे मंडलामधील ४०० कार्डधारकांना प्रति ६२ रुपये लिटर प्रमाणे प्रत्येकी तीन लिटर रॉकेल मिळणार आहे यामध्येही प्रथम येणाऱ्या कार्डधारकाला प्राधान्य देण्यात येणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाहीत अशांना ग्रामपंचायत रहिवासी दाखला पुरावा ग्राह्य धरून केरोसीन उपलब्धते नुसार रॉकेल मिळणार आहे तसेच स्थलांतरित मजुरांना राज्य किंवा केंद्र सरकार ओळखपत्र पुरावा ग्राह्य धरून तेही कुटुंब धारक रॉकेलसाठी पात्र असणार आहेत अशांना सांगोला येथे केरोसीन उपलब्ध होणार आहे.

सरकारची ही योजना यशस्वी झाली तर पुढील मागणीचे नियोजन करून शिधापत्रिकाधारकांना रॉकेल वाटप केले जाणार आहे. तालुक्यातील १० मंडलनिहाय लायन्स धारक वितरकांची नांवे - निलेश भोसले (खवासपूर), सुभाष तानगे (राजापूर) , पंताजी साळुंखे (गायगव्हाण), कमल पलसे (शिवणे), मिर्झा गालिब मुजावर (मांजरी), दया माने ( मागाडे वस्ती जवळा), दीपक काशीद (सोनंद), दत्तात्रय स्वामी (वाणीचिंचाळे), विकास कार्यकारी सेवा संस्था ( यलमर मंगेवाडी) , अहिल्यादेवी महिला उद्योग सहकारी संस्था (जुनोनी), मारुती आलदर (कोळा) यांचेमार्फत ४ हजार कार्डधारकांना रॉकेल वाटप चालू आहे.

## आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे वडील पोपटराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे निधन

### पेनुर येथे पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार





सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे वडील तथा विक्रमवीर आमदार स्वर्गीय गणपतराव देशमुख यांचे ज्येष्ठ सुपुत्र पोपट गणपतराव देशमुख (वय ६९) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी (ता. ११) निधन झाले. गेले काही दिवस ते आजारी होते. त्यांच्यावर मंगळवारी सकाळी ११ वाजता निवासस्थाना समोरील प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार नारायण पाटील, आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार राजन पाटील, प्रशांत परिचारक, उमेश परिचारक , मनोहर डोंगरे, शिवाजीराव काळुंगे सर पी बी रोंगे सर, चेतनसिंह केदार-सावंत, शिवसेनेचे सागर पाटील, उद्योगपती भाऊसाहेब रुपनर, प्रा.पी.सी.झपके, बाळासाहेब एरंडे, मारुती बनकर, डॉ.प्रभाकर माळी, भरत शेळके, बाबुराव गायकवाड,तानाजीकाका पाटील, मोहोळचे सोमेश क्षीरसागर, ॲडिशनल कलेक्टर निराळे, मंगळवेढा सांगोला प्रांताधिकारी बी.आर.माळी यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या पार्थिवास मुलगा आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुखाग्नी दिला.

यावेळी श्रीमती रतनबाई गणपतराव देशमुख, आबासाहेबांची कन्या शोभाताई पाटील, सरोजनी पोपटराव देशमुख, सौ.सुप्रिया पोपट देशमुख, डॉ.सौ निकिताताई देशमुख, गणेश वाघमोडे, डॉ.अनिकेत देशमुख यांच्यासह कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. वाहनातून अंत्ययात्रा काढण्यात आली. यावेळी जनसमुदाय उपस्थित होता.

अण्णासाहेब उर्फ पोपटराव देशमुख हे मूळचे मोहोळ तालुक्यातील पेनूर येथील रहिवासी होते. त्यांचे वडील स्वर्गीय गणपतराव देशमुख हे राज्याच्या राजकारणात दीर्घकाळ सक्रिय राहून विक्रमी अकरा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. मात्र, इतक्या मोठ्या राजकीय वारसाची पार्श्वभूमी असतानाही पोपट देशमुख यांनी कधीही सक्रिय राजकारणात सहभाग नोंदवला नाही. ते साधेपणाने आपल्या मूळ गावी राहून सामाजिक व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडत होते. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या राजकीय प्रवासात व त्यांना आमदार बनविण्यामागे पोपट देशमुख यांचे मोलाचे योगदान असल्याचे मानले जाते. शांत, संयमी व मनमिळावू स्वभावामुळे त्यांना परिसरात विशेष मान होता.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे.

अंत्यसंस्कारासाठी सांगोला तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी, जिल्हा परिषद सदस्य,माजी सदस्य, नेते मंडळी,सूतगिरणी, मार्केट कमिटी, सरपंच, सदस्य यांच्यासह नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरभावी पाणीपुरवठा योजनेची ५९ गावांकडे १ कोटी ६२ लाखांची थकबाकी

## आठ वर्षांनंतरही मंगळवेढा-पंढरपूर पंचायत समितीकडील बिले प्रलंबित

सांगोला : सांगोला तालुक्याची जीवनदायिनी ठरलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उपविभागांतर्गत कार्यरत शिरभावी व ८१ गावांच्या प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेवर थकबाकीचे संकट गडद झाले आहे. एप्रिल २०२६ अखेर ५९ गावांकडे तब्बल १ कोटी ६२ लाख ६७ हजार १६१ रुपये इतकी थकबाकी जमा झाली असून योजनेच्या आर्थिक व्यवस्थापनावर ताण निर्माण झाला आहे. सावे, चिंचोली, महूद बु., खवासपूर, लक्ष्मीनगर, वाढेगाव, मेथवडे, मांजरी, कोळा, वाकी नरळे वस्ती, जुजारपूर आदी गावे थकबाकीत आघाडीवर असल्याचे चित्र आहे.

शिरभावीसह ८१ गावांना वर्षभर अखंडितपणे पाणीपुरवठा करणारी योजना म्हणून या योजनेचा राज्यात नावलौकिक आहे. पण वेळोवेळी थकबाकीची रक्कम वाढत असल्याने ही योजना आर्थिक संकटात सापडली आहे. अनेक गावांची थकबाकी मोठ्या प्रमाणावर आहे. दुष्काळी असलेल्या सोलापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यात देखील वेळेवर पाणीपुरवठा होणारा तालुका म्हणून सांगोला तालुक्याची ओळख आहे. सांगोला तालुक्याची जीवनदायिनी ठरलेली शिरभावी पाणीपुरवठा योजना थकबाकीमुळे आर्थिक संकटात सापडली आहे. सोलापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यातही वेळेवर पाणीपुरवठा होणारा तालुका अशी सांगोल्याची ओळख या योजनेमुळेच निर्माण झाली.

मात्र वाढत्या थकबाकीमुळे योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व नियमित खर्च भागविणे कठीण होत चालले आहे. अनेक गावांची थकबाकी लाखोंच्या घरात पोहोचल्याने प्रशासन चिंतेत आहे.

शिरभावी पाणीपुरवठा योजनेतील थकबाकी असलेली गावे पुढीलप्रमाणे, कंसात थकबाकीची रक्कम , शिरभावी (२,५८,८१९), संगेवाडी (९६,९०८), मेथवडे (१२,५६,९९८), मेथवडे माळी वस्ती (२,५२,३२६), देवळे (१,२२,२४५), मांजरी (९,६७,५५८), बामणी (२,७२,४३७), सावे (३,९४,२३३), धायटी (१,०४,०९०), चिंचोली (३,२९,७४९), हलदहिवडी (७४,०४७), वाकी शिवणे (२,८६,७३४), शिवणे (२,३४,७१८), खिलारवाडी (६१,७१५), महूद बु. (२८,००,५९८), महिम (१,७७,९४४), गायगव्हाण (१९,११५), देवकतेवाडी (२,७७,४८२), खवासपूर (४,४२,५३७), एखतपुर (९२,९३५), लोटेवाडी (२,३७,०८९), कटफळ (४,४०२), अचकदाणी (२,९२,०५४), लक्ष्मीनगर (५,३०,३२३), सोनलवाडी (१७३), बागलवाडी (६०), वाकी नरळे वस्ती (४,६५,२२९), वाकी घेरडी (६५३), वाणीचिंचाळे (७०२), आलेगाव (२,२२,०३०), घेरडी (८७,३०३), मेडशिंगी (२०), वाढेगाव (१३,७३,२५९), लोणविरे (२७,९६९), हणमंतगाव (१,१०५), कडलास (३१,५५८), आगलावेवाडी (२८,३२५), बुरुंगेवाडी (६,२८०), जवळा (१,३७,२९२), राजूरी (९८), कारंडेवाडी (२,८३,६३४), तरंगेवाडी (७२,२७७), भोपसेवाडी (२,७४,१४८), नाझरे (७५११३), वझरे (३,८१,२५५), अनकढाळ (४,३६०), अजनाळे (१३५), य. मंगेवाडी (९०,७००), गोडसेवाडी (१२,६२७), कमलापूर (३,५७८), अकोला वा. (२,६२,६०८), कोळा (६,९९,९८६), बुद्धेहाळ (१९,३५६), सोमेवाडी (९५,८६०), राजापूर (८९,९११), हबीसेवाडी (१,३७,६९८), डिकसळ (४,०६३), हंगीरगे (१,४३,११२), जुजारपूर (२,३७,२९१), हायवे कोळा (२०,८९८) अशी एकूण ५९ गावांकडे तब्बल १ कोटी ४८ लाख ७६ हजार १९५ रुपयांची थकबाकी आहे. तसेच शेतकरी सूत गिरणीकडे ७ लाख ७८ हजार २३७ रुपये, महिला सूत गिरणीकडे २७ हजार ०१०, मंगळवेढा पंचायत समितीकडे २ लाख ८९ हजार २२६, पंढरपूर पंचायत समिती ४३ हजार २००, सांगोला तहसील कार्यालयाकडे २ लाख ५३ हजार २९४ अशी एकूण शिरभावी पाणीपुरवठा योजनेची थकबाकी १३ लाख ९० हजार ९६६ रुपये इतकी आहे. तर मेटकरवाडी, चिकमहूद, इटकी, मानेगाव, डोंगरगाव, सोनंद, उदनवाडी, बलवडी, चिणके, निजामपूर, वाटंबरे, वासूद, केदारवाडी, पाचेगाव बुद्रुक, गौडवाडी, चोपडी, बलवडी, नराळे, पारे, जुनोनी, हटकर मंगेवाडी, हातीद, पाचेगाव खुर्द या २५ गावांनी थकबाकी भरली आहे.

२०१८ च्या दुष्काळात नागरिकांना पिण्याचा पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शिरभावी योजनेमधून मंगळवेढा व पंढरपूर पंचायत समितीच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला टँकर भरण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले होते. परंतु सहा वर्षांनंतरही मंगळवेढा व पंढरपूर पंचायत समितीने शिरभावी योजनेची बिले थकवली आहेत. मंगळवेढा पंचायत समितीकडे २ लाख ८९ हजार २२६ रुपये, पंढरपूर पंचायत समितीकडे ४३ हजार २०० रुपये, सांगोला तहसिल कार्यालयाकडे २ लाख ४५ हजार १८५ इतकी थकबाकी आहे. शिरभावी पाणीपुरवठा योजनेच्या नूतनीकरणाची कामे २७ जुलै २०२४ पासून सुरू आहेत. सदर योजनेच्या नूतनीकरणाचे काम सुरू असून यासाठी ३०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ६०० किमीचे पाईपलाइनचे काम ९० टक्के पूर्णत्वास आले आहे. सदर योजनेच्या माध्यमातून पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा करण्यासाठी चाचणी सुरू आहे. शिरभावी पाणीपुरवठा योजनेची कामे अंतिम टप्प्यात

# महिमच्या लेकीचा आदर्श! बहिणीसाठी धावली सख्खी बहीण पुण्यात किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी



सांगोला : रक्ताच्या नात्यापेक्षा दुसरे मोठे नाते नाही याची प्रचिती सांगोला तालुक्यातील महिम येथील एका घटनेने दिली आहे. महिम येथील दिवानी अनिल बंडगर (वय २६) या तरुण भगिनीला तिची सखखी बहीण संगीता नानासाहेब बंडगर (वय २९) हिने स्वतःची किडनी दान करून नवे आयुष्य दिले आहे. सध्या दोन्ही बहिणींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत.

महिम सारख्या ग्रामीण भागातील या दोन बहिणींनी एकमेकींप्रती दाखवलेल्या या प्रेमाचे आणि त्यागाचे सर्वत्र कौतुक होत आहे. महिम येथील रहिवासी असलेल्या दिवानी बंडगर यांना गेल्या अडीच वर्षांपासून सतत डोकेदुखी आणि उलट्यांचा त्रास होत होता. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे समोर आले. यानंतर दिवानी बंडगर हिच्या दोन्हीही किडन्या फेल झाल्या होत्या.नात्यानं जाऊबाई असणारी पण सख्खी बहीण संगीता बंडगर हिने धाडस करून बहिणीला किडनी देण्याचा निर्णय घेतला. वैद्यकीय तपासणीनंतर तिची किडनी दिवानीला परफेक्ट मॅच झाल्यामुळे तिने किडनी दान देऊन सख्ख्या बहिणीला जीवदानच दिले आहे.

दिवानी बंडगर हिला किडनीचा त्रास सुरू झाल्यानंतर पुणे येथील जहांगीर हॉस्पिटलमध्ये तब्बल सहा महिने तिचयावर डायलेसिस सुरू होते. पुण्यात राहून वैद्यकीय खर्च न परवडणारा होता त्यातच बंडगर कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलक्याची असूनही संकटावर मात करीत तिला जगण्यासाठी धीर दिला.

बंडगर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. उपचारासाठी किडनी दात्याचा शोध सुरू झाला. कुटुंबातील आई, पती आणि सासूबाई यांची प्राथमिक तपासणी करण्यात आली, मात्र कोणाचीही किडनी मॅच होऊ शकली नाही.अशा कठीण प्रसंगी मोठी बहीण संगीता नानासाहेब बंडगर यांनी पुढे येत लहान बहीण दिवानी हीस किडनी देण्याचा निर्णय घेतला. विशेष म्हणजे या दोघी सख्ख्या बहिणी असून नात्याने सख्ख्या जावा देखील आहेत.

सर्व वैद्यकीय चाचण्या यशस्वी झाल्यानंतर, मंगळवार १२ मे २०२६ रोजी पुण्यातील जहांगीर हॉस्पिटल येथे सकाळी ७ ते १० यावेळेत किडनी प्रत्यारोपण प्रक्रिया यशस्वी पार पडल्यानंतर बंडगर कुटुंबियांनी मोकळा श्वास घेतला.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून सांगोला तालुक्यातील ५ ग्रामपंचायतींना इमारत निधी मंजूर



सांगोला : ग्रामपंचायत प्रशासनाचा कार्यभार व्यवस्थित पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतींना नवीन इमारतीची आवश्यकता होती. सांगोला विधानसभा मतदारसंघातील सोनके व तिप्पेहळ्ळी ग्रामपंचायतींना प्रत्येकी २५ लाख आणि आगलावेवाडी, हटकर मंगेवाडी आणि सोनलवाडी यांना प्रत्येकी २० लाख असे पाच ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत नविन ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी एकूण १ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या मागणीला यश मिळाले आहे.

ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व प्रशासकीय अधिकाऱ्यांना गावचा कारभार पाहताना येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या, यासाठी मतदार संघातील ५ ग्रामपंचायत कार्यालयांच्या नूतन इमारतीसाठी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मिळवून दिला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामविकास तथा पंचायतराज मंत्री व सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री.जयकुमारजी गोरे यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी ग्रामपंचायतींना इमारत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अधिवेशनापूर्वी केली होती. या मागणीची दखल घेत ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांनी तत्काळ या ग्रामपंचायतींना मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गतनिधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले.

ग्रामपंचायतींच्या नूतन इमारतींना प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.


# ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



देव घरातल्या दिव्या,रात नाही रे सरली,वात फुलायच्या आधी,
कशी विझुनिया घेली,जाण्या पैलतिरी आधी,कशी नाव उलटली,
मैदानाच्या सवंगडया,खेळी अपुरी राहिली दुःख अंतरी मावेना,
अश्रु दाटले नयनी...!!!



आमचे सासरे कै. ज्ञानदेव(माऊली) दगडू बोराडे यांचे गुरुवार दि. १४ मे २०२६ रोजी अकस्मित दुःखद निधन झाले.
त्यांचे निधनाने बोराडे कुटुंबियांवर कोसळलेल्या या दुखाःत आम्ही सहभागी आहोत.
परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो हीच प्रार्थना.

दशक्रिया विधी शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी सकाळी ७.०० वा. सिध्देश्वर मंदिरासमोर, श्रीगोंदा जि.अहिल्यानगर येथे होणार आहे.

शोकाकूल

* ॲड.रोहित मारूती सोनवणे,सांगोला. * किरण मुने,पुणे.
* ॲड.अनिल कवडे,अहिल्यानगर. * सिध्देश कवडे,नवी मुंबई.